# पुणे शहर व पुणे जिल्हा,सांगली व कोल्हापूर येथील गुन्हयांतील फरारी असलेला रेकॉर्डवरील अटट्ल चंदनचोर व वाहन चोरी करणारे गुन्हेगारांस युनिट-५ गुन्हेशाखेने ठोकल्यां बेडयां

युनिट-५,गुन्हेशाखेकडील पो.ना.गणेश बाजारे यांना त्यांचे खांस बातमीदांरामार्फत माहिती मिळाली की,पुणे शहरांतील हडपसर पोलीस स्टेशन व पुणे ग्रामीणकडील लोणीकाळभोर पो.स्टे.कडील एकूण १३ गुन्हयांत निष्पन्न व पाहिजे असलेला आरोपी नामेः-गणेश अरुण राऊत हा फुरसुंगी पॉवर हाऊस जवळ त्याचेकडे मागे नंबर प्लेट नसलेले एका पांढरे अॅक्टीवा मो.सा.वरुन जाणार असून त्यांचेकडे असलेली मो.सा.ही चोरीची असावी अशी माहिती मिळाली होती.सदर बातमीबाबत प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण,युनिट-५, गुन्हेशाखा,पुणे शहर यांनी खात्री व शहानिशा करुन आपले दिमतीत अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सापळा रचणेबाबत योग्यतो आदेशपर मार्गदर्शन सुचनां देवून मिळाले माहितीप्रमाणे एक इसम एका पांढरे रंगाचे अॅक्टीवा मोटार सायकलवरुन बातमीचे ठिकाणी येताच त्यांस ताब्यांत घेतले.तसेच त्यांस त्याचे नाव पत्ता विचारता त्यांने आपले नांव गणेश अरुण राऊत वय-२९ वर्षे धंदा-ड्रायव्हींग रा. सध्या-स.नं.१११, रुळी देवाची ता.हवेली जि.पुणे मूळ रा.पेन्नूर, ता. मोहोळ,जि.सोलापूर असे सांगितले. त्यांचे ताब्यांतील अॅक्टीवा मो.सा.पांढरे रंगाची पुढे मागे नंबर प्लेट नसलेली हिचेबाबत त्यांचेकडे विचारपूस करतां त्याने उडवाउडवीची उत्तरे दिलेने त्यांचेकडे सखोल तपास करतां त्याने ती आपले आणखी एक साथीदार नामेः- बिरु ऊर्फ प्रेम मधुकर जरग याचेसह हडपसर उड्डाण पुलाखालून चोरलेचे निष्पन्न झालेने हडपसर . पो.स्टे.गुन्हा रजि.नं.६५७/२०१७ भा.दं.वि.क.३७९,३४ प्रमाणेचा गुन्हा उघडकीस आलेने किं.रु.२५,०००/- एक पांढरे रंगाची अॅक्टीवा असा मुद्येमाल त्याचेकडून जप्त करणेत आलेला आहे.

तसेच वरील आरोपींस अटक करुन त्यांचेकडे युनिट-५ चे प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण व त्यांचेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी त्याने यापुर्वी चोरी केलेल्यां चार चाकी वाहनांचे गुन्हयांबाबत कौशल्यपुर्ण तपास केला असतां त्याने यापुर्वी युनिट-५ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी अटक केलेले त्याचे साथीदार नामेः- १) विनायक ऊर्फ बापू रघुनाथ बोंबाळे २) बिरु ऊर्फ प्रेम मधुकर जरग यांचेसह मिळून केलेले हडपसर पोलीस स्टेशनचे हद्यीतील ०२ स्विफ्ट डिझायर , ०१ महिंद्रा पिकअप ०१ तवेरा चोरी व लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे हद्यीतील ०१ तवेरा चोरी असे एकूण अधिक ०५ गुन्हे चारचाकी वाहन चोरीचे व आपला आणखीन एक साथीदार समाधान चौरे याचेसह जत सांगली येथून चोरी केलेली ०१ बोलेरो गाडी असे एकूण ०६ गुन्हे केल्याची कबुली दिल्याने मा.न्यायालयांकडून त्याची पोलीस कस्टडी मंजूर करुन घेवून त्या मुदतीत त्याने सदरची वाहने विक्री केलेले बीड येथील श्री साईनाथ मोटर्स दुकानाचे मालक नामे- चौधरी ऊर्फ विजय बलभिम बोरवडे रा.बीड याचेबाबत शोध घेवून तो फरारी झालेला असलेने त्याचे ऑफिसचे मागे पार्क करुन ठेवलेल्यां हडपसर पोलीस स्टेशनकडील दाखल असलेल्यां गुन्हयांतील ०१ स्विफ्ट डिझायर,०१ महिंद्रा पिकअप व लोणी काळभोर पोलीस स्टेशनकडील दाखल असलेल्यां गुन्हयांतील ०१ तवेरा व सांगली जत पोलीस स्टेशनकडील दाखल असलेल्यां गुन्हयांतील ०१ बोलेरो असे एकूण किं.रु.१८,५०,०००/-